गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२७७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १२ मार्च, २०२४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या २७७व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. जयंत कुमार बांठिया
समर्थ अंगण, बिल्डींग-३A,
पु.ल.देशपांडे रोड, मिल्लत नगर,
अंधेरी —पश्चिम,
मुंबई — ४०० ०५३ - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),
मुंबई - ४०० ०५१. - सदस्य

महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व),
मुंबई - ४०० ०५१. - सदस्य

प्रशासक / आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
(विशेष प्रकल्प)
सामान्य प्रशासन विभाग, (अ.का.)
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

**********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७७व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ०९ फेब्रुवारी, २०२४ (शुक्रवार) |
| वेळ | : | दुपारी ०४.०० वाजता |
| स्थळ | : | मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| डॉ. नितीन करीर<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्रीमती वल्सा नायर सिंग<br>अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री. असीम गुप्ता<br>प्रधान सचिव (१)<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ. संजय मुखर्जी<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित:**

श्री. अश्विन मुदगल
अतिरिक्त महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. राधाबिनोद शर्मा
सह महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. अनिल साळुंखे
संचालक (कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. सुनिल ढाकेकर
प्रमुख अभियांत्रिकी,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. धनंजय चामलवार
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. मिलींद पाटील
प्रमुख,
नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्रीमती नीता मसुरकर
मुख्य लेखा अन्वेषण अधिकारी
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री. चंदन शिरसाट
सचिव, कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी डॉ. नितीन करीर, मा.मुख्य सचिव यांचे कार्यकारी समितीचे नवे "अध्यक्ष" म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच, श्री. मनोज सौनिक, तत्कालीन मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीचे 'अध्यक्ष' म्हणून बजाविलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र.१ : **प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या २७६व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

बाब क्र.२ : **प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या २७६व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीने कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह येथील सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम करण्यासाठी व्यवस्थापन सल्लागाराच्या निविदेतील लघुत्तम आर्थिक देकारास व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीस मान्यता देणेबाबत.**

३.१ महानगर आयुक्त यांनी प्रस्ताव सादर करताना असे नमूद केले की, मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्ह, मुंबई सागरीकिनारामार्गाच्या (Mumbai Coastal Road) दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम या प्रकल्पाची शक्यशक्यता तपासणे (Feasibility Study), सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (Detailed Project Report), कंत्राटदाराच्या नेमणुकीसाठी निविदा प्रक्रिया करणे आणि प्रकल्प व्यवस्थापनासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी मे.पडॅको कंपनी लि.यांची सल्लागार म्हणून दि.१५ नोव्हेंबर, २०२२ रोजी नेमणूक करण्यात आली.

३.२ या प्रकल्पाकरीता ₹८०५६ कोटीइतक्यारक्कमेच्याप्रकल्पाच्या एकूण अंदाजित खर्चास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि.१० मार्च, २०२३ रोजी झालेल्या १५४व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

३.३ अतिरिक्त महानगर आयुक्तांनी असे विशद केले की, सल्लागाराने शिफारस केलेल्या बदलांमुळे प्रकल्पाच्या एकूण किंमतीत सुमारे ₹६८६ कोटी रुपयांची वाढ झाल्यामुळे सद्य:स्थितीत प्रकल्पचा एकूण खर्च ₹८७४२ कोटी इतका झाला आहे. या रक्कमेत बांधकाम खर्च, तात्पुरती रक्कम (provisional sum), पर्यावरण सुरक्षासंबंधित तरतूद, लेबरसेस, इन्शुरन्स, भू-संपादन, भाववाढ, प्रकल्प व्यवस्थापनसल्लागाराची फी इत्यादी बाबींचा अंतर्भाव आहे. प्रकल्पाचा वाव वाढल्यामुळे प्रकल्पाचा बांधकाम कालावधी ४८ महिन्या ऐवजी ५४ महिने इतका करण्यात आला आहे. सदर बाबत कार्यकारी समितीच्या २७६व्या बैठकीत अवगत करण्यात आले होते.

३.४ अतिरिक्त महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्ह, मुंबई सागरी किनाराप्रकल्पाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम व अन्य तदनुषंगीक कामे करण्याकरिता मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लि. यालघुत्तम निविदाकाराचा सर्व करांसहित व तात्पुरत्या रक्कमेसह असलेला ₹७,७६५,०९,६६,०००/- (रुपये सात हजार सातशे पासष्ठ कोटी नऊ लाख सहासष्ठ हजार फक्त) इतक्या रकमेचा आर्थिक देकार रास्त व वाजवी आढळल्यामुळे सदर देकारास कार्यकारी समितीच्या दि.१२ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या २७६व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तद्नंतर कंत्राटदारास निविदा स्विकृतीचे पत्र दि.२७ सप्टेंबर,२०२३ रोजी देण्यात आले.

३.५ चर्चेदरम्यान, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नेमणुकीसाठी ई-निविदा प्रपत्रे १४ ऑगस्ट, २०२३ रोजी महानिविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. निविदा स्वीकरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि.१९ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत सल्लागाराच्या नियुक्तीसाठी दोन सल्लागार संस्थाकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त दोन निविदांच्या तांत्रिक व आर्थिक देकारांचे मुल्यमापन करुन शिफारस करण्याकरिता दि. २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी निविदा शिफारस समितीची नियुक्ती करण्यात आली.

३.६ चर्चेदरम्यान, दोन्ही पात्र निविदाकारांचे तांत्रिक देकारचे लिफाफे उघडून प्रस्तावांच्या छाननीबाबत सविस्तर चर्चा झाली. निविदा शिफारस समितीच्या बैठकीत समितीस सादर करण्यात आलेले गुणांकन खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **प्राप्त गुण** (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | मे. हिल-टीसीई जेव्ही | ९२.४५ |
| २ | मे. पिनी-इजिस जेव्ही | ८७.१५ |

निविदेतील तरतुदींनुसार तांत्रिक गुणांकन ७५ पेक्षा अधिक असल्याने दोन्ही निविदाकार तांत्रिक निकषावर पात्र ठरल्याचे समितीस आढळून आले.

निविदेतील क्युसीबीएस (QCBS) तत्वाआधारे व सुंत्रानुसार गुणांकन केलेले निविदाकारांचे तांत्रिक गुण खालीलप्रमाणे :

| निविदाकार | **प्राप्त तांत्रिक गुण** | **सुत्रानुसार तांत्रिक गुण: (टी*/टीएम**x१००)=टीएस** |
|---|---|---|
| हिल-टीसीई जेव्ही | ९२.४५ | ९२.४५/९२.४५ x १००=**१००** |
| पिनी-इजिस जेव्ही | ८७.१५ | ८७.१५/९२.४५ x १००=**९४.२७** |

टी*: निविदाकाराचे तांत्रिक प्राप्त गुण

टीम**: सर्वाधिक तांत्रिक गुण

दोन्ही पात्र निविदाकारांचे आर्थिक देकार असणारे लिफाफे उघडून एकत्रित (तांत्रिक व आर्थिक) छाननी प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्याची शिफारस, निविदा शिफारस समितीने केली.

३.७ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, निविदा शिफारस समितीची चौथी बैठक दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजी झाली.सदर बैठकीत निविदाकारांनी सादर केलेले आर्थिक देकार खालीलप्रमाणे समितीस अवगत करण्यात आले.

| निविदाकार | आर्थिक देकाराची रक्कम (रु.) (वस्तु व सेवा कर वगळून) | सुत्रानुसार आर्थिक गुण: (१००xएफएम*/एफ**) = एफएस |
|---|---|---|
| मे. हिल-टीसीई जेव्ही | २४६,२७,३३,०००/- | १०० x (२२४,९२,१०,०००/ २४६,२७,३३,०००) = **९१.३३** |
| मे. पिनी- इजिस जेव्ही | २२४,९२,१०,०००/- | १०० x (२२४,९२,१०,०००/ २२४,९२,१०,०००) = **१००.००** |

एफएम*: लघुत्तम आर्थिकदेकार

एफ**: निविदाकाराच्या आर्थिक देकाराची रक्कम

३.८ चर्चेदरम्यान, निविदेतील अटीनुसार तांत्रिक गुण व आर्थिक देकारामध्ये (८०:२० गुणोत्तर) संबंधित संयुक्त गुण प्राप्त करणाऱ्या सल्लागाराचा प्रस्ताव ग्राहय धरण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन खालील तक्त्यामध्ये प्राप्त संयुक्त गुण,समितीस सादर करण्यात आले:

| निविदाकार | तांत्रिक गुण (८० पैकी) | आर्थिक गुण (२० पैकी) | एकत्रित गुण (१०० पैकी) | क्रमवारी |
|---|---|---|---|---|
| मे. हिल-टीसीई जेव्ही | ८०.०० | १८.२७ | ९८.२७ | सर्वाधिक एकत्रित गुण |
| मे. पिनी- इजिस जेव्ही | ७५.४१ | २०.०० | ९५.४१ | - |

वरील प्रमाणे मे.हिल-टीसीई जेव्ही यांना सर्वाधिक एकत्रित गुण मिळाले असून त्यांचाआर्थिक देकार रु.२४६,२७,३३,०००/- किंमतीचा आहे. निविदाकाराने दिलेल्या रु.२४६,२७,३३,००० + जी.एस.टी. वगळता या रक्कमेचा आर्थिक देकार जास्त आहे असे मत समितीने व्यक्त केले.त्यामुळे निविदा शिफारस समितीने निविदाकाराकडून सदरच्या आर्थिक देकाराच्या पृष्ठयर्थ सविस्तर खुलासा मागविण्याचे निर्देश दिले.

३.९ सदर बाब टिप्पणीच्या अनुषंगाने चर्चेदरम्यान प्रमुख अभियांत्रिकी यांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणात मोठया पायाभूत प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सल्लागाराच्या नियुक्तीकरीता भारत सरकारच्या व्यय विभागाच्या जुन, २०२२ मधील मार्गदर्शक निर्देशानुसार ८० तांत्रिक गुण व २० आर्थिक गुण अशी तरतुद करण्यात आली आहेव QCBS पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. सर्वसाधारणपणे सल्लागाराचे शुल्क त्याने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाशी (Manpower) निगडित असते. तथापि, सदरच्या निविदेतील अटी शर्तीनुसार सल्लागाराच्या शुल्कात उपलब्ध करुन देण्यात आलेले व्यावसायिक मनुष्यबळ व प्रकल्पाची भौतिक प्रगती यांच्याशी निगडीत शुल्क अदा करण्यात येणार आहे.

मा.मुख्य सचिव यांनी सूचित केले की, प्राधिकरणाने सल्लागारांच्या नियुक्तीकरिता तांत्रिक निकष कठोर करुन पात्र निविदाकारांचा लघुत्तम आर्थिक देकार असणा-या निविदाकाराची निवड करण्याबाबत विचार करावा.

३.१० अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा शिफारस समितीची ६वी बैठक दिनांक १८/१२/२०२३ रोजी झाली.या बैठकीत मे.हिल-टिसीई जेव्ही यांच्यातर्फे प्राधिकरणाच्या विनंतीस अनुसरुन सल्लागाराने दिलेले उत्तर निविदा शिफारस समितीस सादर करण्यात आले.या पत्राद्वारे निविदाकाराने सदरच्या आर्थिक देकारामध्ये कोणत्याही प्रकारची अतिरिक्त सुट देण्याबाबत असमर्थता दर्शविली. सल्लागाराने निविदाकाराच्या पत्राचे अवलोकन करुन त्याबाबत समितीस खालील स्पष्टीकरण सादर केले:

अ) निविदाकाराने महत्त्वाच्या ५ परदेशी व्यवसायिक तज्ञांना नियुक्त करण्याबाबत निविदेत तरतूद आहे. तसेच या प्रकल्पासाठी कायमस्वरुपी तत्त्वावर ६ तज्ञ व्यावसायिक व्यक्ती कंपनीच्या हजेरीपटावर असण्याचीही तरतूद आहे. सदर प्रकल्प पूर्णकरण्याचा एकूण कालावधी ७८ महिने (दोषदायित्त्व कालावधीसहीत) इतका आहे. या कालावधीकरीता सदर प्रकल्पाकरीता आवश्यक व्यावसायिकरित्या निपूण मनुष्यबळ टिकवून धरणे आव्हानात्मक आहे. तसेच निविदेतील अटी-शर्ती नुसार महत्त्वाच्या पदावरील व्यक्ती बदलल्यास त्याबाबत दंड आकारण्याची तरतूद आहे. सबब, सदर मनुष्यबळाच्या उपलब्धेकरीता आवश्यक ती आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे.

आ) निविदेतील अटी-शर्तीनुसार महागाईचा दर सुमारे ५ ते ६% (रिझर्व्ह बँकेच्या मानकानुसार) या दरम्यान असल्याचे आढळले आहे. निविदाकारास त्यानुसार शुल्क अदा करण्यात येणार आहे. तथापि, व्यवसायिक तज्ञांना /मनुष्यबळाला टिकवून धरण्याकरीता दरवर्षी सुमारे १०% ते १५% पगारवाढ देणे अपेक्षित असल्याचे समितीस सादर करण्यात आले.

इ) मुंबई महानगर प्रदेशात मोठया प्रमाणात पायाभूत सुविधांचे मोठे प्रकल्प राबविण्यात येत आहेत.या प्रकल्पांमध्ये सर्वसाधारणपणे सल्लागाराचे शुल्क उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे(on man-month basis) करण्यात येते वते एकूण शुल्काच्या सर्वसाधारणपणे १००% ते ८०% असते. तथापि, सदरच्या निविदेतील अटी-शर्ती नुसार ४०% देयक हे प्रकल्पाच्या प्रगतीवर आधारीत व ५४% रक्कम मनुष्यबळावर आधारीत आहे.ही तरतूद सल्लागाराची कार्यक्षमतावाढविण्याच्या अनुषंगाने करण्यात आली आहे. तथापि

यामुळे सल्लागारास मिळणारे शुल्क प्रकल्पाच्या प्रत्यक्ष प्रगतीशी निगडीत आहे.सबब याबाबतची जोखीम कमी करणे आवश्यक आहे.

ई) सदर निविदेमध्ये कंत्राटीय किंमतीच्या १०% म्हणजेच सुमारे रु. २५ कोटी इतक्या रकमेची कामाची बँक (पर्फॉर्मन्स बँक) गॅरेंटी प्राधिकरणाकडे ७८ महिन्यांकरीता जमा करणेची तरतूद आहे.

उ) निविदाकारास देण्यात येणाऱ्या आगाऊ उचल रकमेवर (Mobilisation Advance) १०% हून अधिक दराने व्याज देण्याची तरतूद आहे.

उपरोक्त सर्व बाबींकरीता देकारात अतिरिक्त आर्थिक तरतूद केल्यामुळे निविदाकाराचा एकूण आर्थिक देकार जास्त असण्याची शक्यता आहे.

३.११ चर्चेदरम्यान, सदर प्रकल्पाकरीता कंत्राटदारास स्विकृतीपत्र (Letter of Acceptance) देण्यात आले आहे.प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम लवकरच सुरू होणार आहे.सदर निविदा प्रक्रिया रद्द करून फेरनिविदा बोलाविल्यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीस विलंब होण्याच्या शक्यतेची नोंद निविदा शिफारस समितीने घेतली.त्याचप्रमाणे निविदाकारांचा कल लक्षात घेता फेरनिविदा बोलाविल्यास आर्थिक देकार सध्यापेक्षाही जास्त येण्याच्या शक्यतेचीही नोंद निविदा शिफारस समितीने घेतली.

३.१२ सल्लागार मे.पेडॅको यांनी मुंबई मेट्रो लाईन-३, सागरी किनारा मार्ग तसेच खारघर-तुर्भे जोडरस्ता इत्यादी मुंबई महानगर प्रदेशातील प्रकल्पांवरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे शुल्क संबंधित प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ३% ते ५% या दरम्यान असल्याचे समितीस सांगितले. मे.हिल-टिसीई (जेव्ही)यांचा आर्थिक देकार या प्रकल्पाच्या एकूण अंदाजित किंमतीच्या सुमारे २.८५% इतकाआहे.

३.१३ चर्चेदरम्यान, सदर प्रकल्प मुंबईतील अतिशय वर्दळीच्या / दाट लोकवस्तीच्या शहर भागातून जाणारा व तांत्रिकदृष्टया आव्हानात्मक आहे. प्रकल्पातील बोगद्याची जमीनीखालील खोली सुमारे ४५ मी.इतकी जास्त असून प्रकल्पाची मार्गरेषा रेल्वेमार्ग, मेट्रो लाईन-३ तसेच, मोठ्या जलवाहिन्यांच्या खालून जात आहे.सदर प्रकल्पाच्या सुमारे १२.२ मीटर इतक्या मोठ्या व्यासाच्या रस्त्याच्या बोगद्याचे काम दोन टनेल बोअरींग मशीन्सद्वारे करण्यात येत आहे.तसेच याकरीता प्रकल्पावरील संबंधित व्यावसायिक तज्ञांना वरील सर्व प्रकल्प राबविणाऱ्या प्राधिकरणांशी प्रभावीरित्या समन्वय राखून सदर काम करणे अपेक्षित आहे, असे नमूद केले.

३.१४ अतिरिक्त महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, निविदा शिफारस समितीने मे.हिल इंटरनॅशनल प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड -मे.टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स लिमिटेड (जेव्ही) या निविदाकाराचार २४६,२७,३३,०००/- (दोनशे सेहेचाळीसकोटी सत्तावीस लाख तेहेतीस हजार फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) रकमेच्या आर्थिक देकारास व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी शिफारस केली असून याबाबत महानगर आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

३.१५ निविदेतील तरतूदीनुसार सर्वाधिक एकत्रित गुण मिळविणा-यामे. हिल इंटरनॅशनल प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स लिमिटेड (जेव्ही) या निविदाकाराचा ₹२४६,२७,३३,०००/- (दोनशे सेहचाळीस कोटी सत्तावीस लाख तेहेतीस हजार फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) रकमेचा आर्थिक देकार स्विकारण्याच्या प्रस्तावाबाबतकार्यकारी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन नंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.

**ठराव क्र.<u>१४७५</u>:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाया इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारेमुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीन ड्राईव्ह येथील सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचेबांधकाम करण्यासाठी मे.हिलइंटरनॅशनल प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड-मे.टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स लिमिटेड (जेव्ही) या निविदाकाराचार २४६,२७,३३,०००/-(दोनशे सेहचाळीस कोटी सत्तावीस लाख तेहेतीस हजार फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) आर्थिक रकमेचा देकार स्वीकृत करुन त्यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कंत्राटीय कालावधीत वेळोवेळी बदल झाल्यास कंत्राटीय तरतुदींच्या अधीन राहून कंत्राटीय किंमतीमध्ये योग्य ते समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेचयाअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलांसह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक ती सर्व पुढील कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."